# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 19 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १९ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्या विरोधातला अविश्वास प्रस्ताव उपसभापतींनी फेटाळला
- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत डिसेंबरचा हप्ता हिवाळी अधिवेशन संपताच, बहिणींच्या खात्यात जमा केला जाईल-मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- कांदा निर्यातीवर लावलेले २० टक्के शुल्क तातडीनं रद्द करावं-उपमुख्यमंत्री अजित पवार यांची केंद्राकडे मागणी

आणि

- चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने पाकिस्तान आणि तटस्थ ठिकाणी होणार असल्याचं आयसीसीकडून स्पष्ट

****

उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्या विरोधातला अविश्वास प्रस्ताव उपसभापती हरिवंश यांनी फेटाळून लावला आहे. सभापतींची प्रतिष्ठा डागाळण्यासाठी अत्यंत घाईगडबडीत आणलेल्या या प्रस्तावात त्रुटी असल्याचं उपसभापतींनी सांगितलं. घटनात्मक संस्थांवर चिखलफेक करणं, हाच या प्रस्तावाचा उद्देश असल्याचं निरीक्षण उपसभापतींनी नोंदवलं आहे.

****

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलच्या वक्तव्यावरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या कामकाजात आजही व्यत्यय आला. लोकसभेचं कामकाज प्रथम दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.

राज्यसभेतही कामकाज सुरु झाल्यावर विरोधकांनी या मुद्यावर दिलेला स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यामुळे विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब झालं. त्यानंतर कामकाज सुरू झाल्यावर सत्ताधारी पक्षाच्या फागनोक कोन्याक यांनी खासदार राहुल गांधी यांच्या सदनाबाहेरच्या आक्षेपार्ह वर्तनाबाबत सभापतींकडे तक्रार केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनीही राहुल गांधी यांच्या वर्तनामुळे दोन खासदार पडून जखमी झाल्याचं सांगत, गांधी यांनी माफी मागावी, असं म्हटलं आहे.

****

दरम्यान, संसद भवन परिसरात सत्ताधारी आणि विरोधकांच्या वतीनं आज आंदोलन करण्यात आलं. डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचा काँग्रेसकडून होत असलेल्या अपमानाविरोधात भाजपाच्या खासदारांनी आंदोलन केलं, तर बाबासाहेबांबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या वतीनं मोर्चा काढण्यात आला.

****

मागच्या सरकारनं सुरू केलेल्या सर्व योजना आपलं सरकार सुरू ठेवणार असून, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत डिसेंबरचा हप्ता हिवाळी अधिवेशन संपताच, बहिणींच्या खात्यात जमा केला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. गेल्या अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणाच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला मुख्यमंत्र्यांनी आज विधानसभेत उत्तर दिलं, त्यावेळी ते म्हणाले –

> ***आज यानिमित्त या सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की, कोणतीही शंका मनात ठेवू नका. ही जी आश्वासनं आम्ही दिलेली आहेत, ज्या ज्या योजना आम्ही सुरू केलेल्या आहेत, एकही योजना आम्ही बंद होऊ देणार नाही. ज्या लाडक्या बहिणींनी महायुतीवर प्रेम दाखवलं, हे अधिवेशन संपल्याबरोबर डिसेंबर महिन्याचा हप्ता त्यांच्या खात्यामध्ये आम्ही टाकतो आहोत.***

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राबाबत विरोधकांचे सर्व आरोप खोडून काढतांना, सध्या ईव्हीएमसोबत कार्यरत असलेली व्हीव्हीपॅट यंत्रणा म्हणजे मतपत्रिकेवर मतदान घेतल्यासारखंच असल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं. विविध पक्षांच्या नेत्यांनी मतदानाच्या टक्क्याबाबत, टपाली मतदानाबाबत, तसंच इतरही अनेक मुद्यांवर

घेतलेल्या आक्षेपांचं मुख्यमंत्र्यांनी सविस्तर उदाहरणं देत निरसन केलं. जनतेनं दिलेला कौल विरोधकांनी स्वीकारावा, असं आवाहनही त्यांनी केलं

***हे जे मॅनडेट जनतेने आम्हाला दिलेलं आहे, कृपया मॅनडेट स्वीकारा. जेव्हा तुम्ही मॅनडेट नाकारता, आमचा अपमान नाहीये. आम्हाला तर भारताच्या संविधानाने इथं बसवलंय. पण त्याचे संविधानाने ज्या लोकांना मतदान करण्याचा अधिकार दिलाय, त्याचा अपमान याठिकाणी करू नका ही माझी तुम्हाला विनंती आहे.***

विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या चर्चेला उत्तर दिलं. महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचे राज्य करतानाच, विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे. मागील अडीच वर्षात महाराष्ट्राच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता समृध्द महाराष्ट्र हे आमचं एकत्रित मिशन असल्याचं शिंदे म्हणाले. आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, अशी ग्वाही देतानांच, जनतेच्या विश्वासामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. आता अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचं वचन देत असल्याचं, शिंदे यांनी नमूद केलं.

****

परभणी आणि बीड जिल्ह्यात झालेल्या घटना ह्या पुरोगामी महाराष्ट्राला तसंच संताच्या भूमीला कलंक लावणाऱ्या आहेत अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. ते आज परभणी आणि बीड जिल्ह्यातील घटनेबाबत विधानसभेत बोलत होते. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी जबाबदार पोलिसांवर अद्याप कठोर कारवाई का केली नाही असा प्रश्न त्यांनी यावेळी विचारला.

****

विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांची एकमताने निवड झाली. राम शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याचं उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी जाहीर केलं. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राम शिंदे यांचं स्वागत केल, तसंच त्यांना शुभेच्छा दिल्या.

****

विधानसभेत पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली. फुलंब्रीच्या आमदार अनुराधा चव्हाण यांनी या चर्चेत सहभागी होत, आपल्या मतदार संघातल्या विविध रस्त्यांच्या कामाचे कार्यारंभ आदेश निघून पाच महिने उलटून गेल्यावरही कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली नसल्याकडे लक्ष वेधलं. विहित मुदतीत काम सुरू न करणाऱ्या कंत्राटदाराचं कंत्राट रद्द करण्याची मागणी त्यांनी केली.

****

धाराशिवच्या तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग परिसरातील कुरनूर मध्यम प्रकल्पातील ५५ वर्ष जुन्या पाणी वितरण व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी चालु हिवाळी अधिवेशनात १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. ही दुरुस्ती झाल्यास, १० गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्राला त्याचा लाभ होणार असल्याची माहिती तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

****

केंद्र सरकारनं कांदा निर्यातीवर लावलेले २० टक्के शुल्क तातडीनं रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. पवार यांनी केंद्रीय व्यापार आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून ही मागणी केली. श्रीलंका सरकारनं कांद्यावरील आयातशुल्क २० टक्क्यांनी कमी करुन अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरु केल्यानं नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांत निर्यात करता यावा असं पवार यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

****

अल्पसंख्याक समाजानं आपल्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी संगिता राठोड यांनी केलं आहे. त्या काल जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक अधिकार दिवस पार पडला त्यावेळी बोलत होत्या.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात आज पासून ते येत्या मंगळवार पर्यंत सुशासन सप्ताह राबवण्यात येत आहे. या सुशासन सप्ताहात जनतेने सहभागी व्हावे असे आवाहन संगीता राठोड यांनी केलं आहे.

***हा जो सप्ताह आहे तो केंद्र सरकारने साजरा करण्याच्या सूचना दिल्या आहेत या सप्ताह मध्ये ज्या काही सर्व सामान्य जनतेच्या – गोरगरिबांच्या ऑन लाईन आणि ऑफ लाईन दोन्ही प्रकारच्या***

***तक्रारींचा निपटाला करायचा आहे मी आपल्या जिल्ह्यातील सर्व जनतेला आवाहन करते की आपण या सप्ताह मध्ये जास्तीत जास्त प्रमाणामध्ये आपल्या ज्या काही अडचणी असतील ज्या विभागाशी बंधित असतील त्या विभागाशी आपण संपर्क करावा.***

****

हिंगोली जिल्ह्यात आजपासून २४ डिसेंबरदरम्यान सुशासन सप्ताह पाळला जात आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी नुकतेच जिल्ह्यातील सर्व विभागांना सुशासन सप्ताहा बाबत सूचना दिल्या आहेत. आज पहिल्याच दिवशी जिल्ह्यात विविध कार्यालयातर्फे नागरिकांची सनद वाचनाने या सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. उद्या या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयामार्फत सामाजिक सहाय्य योजनेचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

****

क्रिकेट

आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने पाकिस्तान आणि तटस्थ ठिकाणी होणार असल्याचं आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं आज स्पष्ट केलं. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीत यजमान पाकिस्तानसह भारत, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश, इंग्लंड, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघांचा समावेश आहे. स्पर्धेचं वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचं आयसीसीच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. पाकिस्तान क्रिकेट संघानं २०१७ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचं विजेतेपद पटकावलं होतं.

****

छत्रपती संभाजीनगरच्या महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढवण्याच्या हेतूनं लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ नंतर सलग तीन वेळा ऑनलाईन पद्धतीनं वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत.

****